# MARATHI (009)
# SAMPLE PAPER (2018-19)
# STD- X
# SECTION- A

**प्रश्न १ खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (६)**

लहानग्या श्यामने एकदा गुलबक्षीच्या कळ्या तोडून आणल्या. ते पाहून श्यामची आई त्याला म्हणाली," श्याम, अरे अशा मुक्या कळ्या तोडू नयेत. झाड म्हणजे फुलांची आईच. तिच्या मांडीवरच कळ्या चांगल्या फुलतात."संध्याकाळी श्याम खेळून आला की पुन्हा आंघोळ करी. एका संध्याकाळी श्याम कपडे काढून नेहमीप्रमाणे अंगणातील दगडावर आंघोळीसाठी जाऊन बसला.आईने त्याचे अंग खसाखसा चोळून त्याला आंघोळ घातली; त्याचे अंग पुसले.तसा श्याम तिला म्हणाला,"माझ्या पायाचे तळवे ओले आहेत,त्याला घाण लागेल तुझा पदर पसर त्यावर मी पाय ठेवीन."

श्यामचा हट्ट आईने पुरवला अन ती त्याला म्हणाली," श्याम, पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस, तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो."अशा लहानसहान प्रसंगातून आईने श्यामला शिकवण दिली, चांगले वळण लावले. 'श्यामची आई' मधील श्याम म्हणजे साने गुरूजी! ते नेहमी म्हणत; आई माझा गुरू, आई माझा कल्पतरू!

अमळनेरच्या शाळेत गुरुजी शिकवत होते.तिथल्या वसतिगृहाचे प्रमुखही होते.मुलांना शिकवताना आणि सांभाळताना ते मातेच्या ममतेने त्यांचे सारे काही करत.वसतिगृहातल्या मुलांचे खाणे–पिणे, दुखणे, अभ्यास ,खेळ अशा सर्व गोष्टींकडे त्यांचे बारीक लक्ष असे. वर्गातल्या चार भिंतींत मिळणारे शिक्षण त्यांना पुरेसे वाटत नव्हते. त्या भिंतींच्या बाहेर जी विशाल, सुंदर , विविधतेने नटलेली सृष्टी आहे तिची ते मुलांना ओळख करून देत.गुरुजींनी शाळेत केवळ पाठ्यपुस्तकातलाच इतिहास शिकवला नाही; तर स्वातंत्र्यासाठी घडत असलेल्या इतिहासाचाही परिचय करून दिला. १९३० मध्ये स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी गुरुजींनी शाळेचा निरोप घेतला.व्यक्तीगत जीवनाचा विचार त्यांनी बाजूला सारला व स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली.ते तुरुंगात गेले, शिक्षा भोगली. फुलबाग फुलवली, गाणी रचली, नाटके लिहिली. माणसाने माणसावर प्रेम करावे तसेच सृष्टीचीही ओळख करून तिच्यावरही प्रेम करावे, अशी त्यांची शिकवण होती.

अखेरच्या दिवसांत गुरुजींना राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास लागला होता.जात, धर्म, वंश, भाषा, असा कोणताही भेदभाव कोणाच्याही मनात नसावा; सारा समाज हे कुंटूंब बनावे ही त्यांची तळमळ होती. त्यासाठी त्यांनी "आंतरभारतीची' चळवळ उभी केली.

– राजा मंगळवेढेकर

**प्रश्न–**

१.आई या शब्दाचा समानार्थी शब्द खालीलपैकी कोणता? (१)

( जनाई, जानकी, जननी)

२."श्यामची आई" मधील श्याम म्हणजे कोण? (१)

३.वरीलउताऱ्यास योग्य शीर्षक दया. (१)

**किंवा**

३.<u>**त्यांच्या**</u> आठवणी, त्यांचे साहित्य आणि विचार यांचा अमोल ठेवा आपल्याजवळ सतत राहील.

(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

४.अखेरच्या दिवसात गुरुजींना कशाचा ध्यास लागला? आंतरभारतीची चळवळ का उभारण्यात आली? **(३)**

**प्रश्न २ खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

मानवी जीवनात "शांती" हे सर्व सुखाचे आगार मानले जाते. माणूस मनाची शांती 'कस्तुरीमृगाप्रमाणे' सगळीकडे, विविध मार्गांनी प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला वाटते, पैसे मिळाले की मनाला शांती मिळेल म्हणून तो भरपूर पैसा कमवण्याच्या मागे लागून खूप पैसे कमवतो, पण त्याचा उपयोग होत नाही. उलट पैसे आले की शांती जाते असाच अनुभव लोकांना येतो.तर कोणाला वाटते की चांगला आहार घ्यावा, तब्येत चांगली ठेवावी, व्यायाम, योगासने करावीत,शारीरिक तंदुरुस्ती असली की शांती मिळतेच. पण तसेही होताना दिसत नाही. आणखी काही जणांना असे वाटते, की आपल्याला मानमरातब मिळाला, चांगले प्रतिष्ठेचे पद मिळाले की शांती मिळेल आणि शेवटी असे लक्षात येते, की मनाच्या शांतीचा मार्ग हा भौतिकतेच्या गल्ल्यांमधून जात नाही, तर तो त्यागाच्या महामार्गावरून जातो.

शांती म्हणजे मनाचे विचलित न होणे. जीवनातील कामक्रोधादी विकारांचे दुष्परिणाम शांती नाहीशी करते. शांतीत समाधान दडलेलेअसते. संसारातील त्रिविधतापाचे शमन केवळ शांतीमुळेच होते. शांती असेल तर जीवन हलके– फुलके होते. शांतीच्या अभावाने जीवन सर्व बाजूंनी दु:खमय बनते. यासाठी प्रत्येकाने शांतीची कास धरली पाहिजे.

**प्रश्न – खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** (२)

१. अ) शांती म्हणजे ..... चे विचलित न होणे.

( तन, मन, धन )

ब) वरील उताऱ्यात कोणत्या प्राण्याचे नाव आले आहे?

(हरीण, मृग,हत्ती )

२. मनाच्या शांतीचा मार्ग कोठून जातो? **(१)**

**३.**वरील उताऱ्यास योग्य शीर्षक दया. **(१)**

**किंवा**

३.प्रत्येकाने शांतीची कास धरली पाहिजे.

(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

४.सामान्य माणूस शांती मिळवण्यासाठी कोणकोणते मार्ग शोधतो? **(२)**

## SECTION- B

**प्रश्न ३ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.**(कोणताही एक ) (७)

**१. निसर्ग माझा सोबती**

मुद्दे– निसर्ग व मानव यांचा संबंध.... निसर्गातील प्रतिके .. ..नदी, समुद्र,आकाश,सूर्य,झाडे,पशू,पक्षी, माणसाला प्रसन्न करतात.... निसर्ग माणसावर प्रेम करतो.... मानवाच्या मनात द्वंद्व.... निसर्ग समतोल साधतो.... संरक्षणाची जबाबदारी... मानवाचे कर्तव्य.

**२. निवृत्त जवानाचे आत्मवृत्त**

मुद्दे –बालपण , शिक्षण.... सैनिकी जीवनाची ओढ.... सैन्यात भरती... सैनिकी शिक्षणाचा व युद्धाचा अनुभव....शौर्य... सेवानिवृत्त..... आता काय वाटते?.... पूढील पिढीकडून अपेक्षा.

**३.मी पक्षी झालो तर....**

मुद्दे– आकाशात उडणारे पक्षी... मनात विचार का आला? कोणता पक्षी व्हावे असे वाटते?...रम्य कल्पना....भारतभ्रमण....निसर्गाचा सहवास.... मुक्त जीवनाचा आनंद....फायदे तोटे

**किंवा**

**प्रश्न ३ दिलेल्या मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा. गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

**मुद्दे–** एक वृद्ध शेतकरी.......शेतात आंब्यांची रोपे लावणे... राजाचे आगमन.. शेतकरी व राजा यांच्यातील संवाद ...." या झाडाची फळे तुला कशी खायला मिळणार?"राजाचा प्रश्न .. .. शेतकऱ्याचे उत्तर.... राजाला आनंद....मोहरांची थैली बक्षीस....तात्पर्य.

**प्रश्न ४** अनिल / अनिता पाटील, ४५, रूईकर कॉलनी, मु.पो. आंबेगाव येथून व्यवस्थापक, भारत विजान भांडार, लक्ष्मी रोड,पुणे विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने प्रयोगशाळेसाठी साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे)

**किंवा**

**प्रश्न ४** गौतम / गायत्री चित्रे, विद्यार्थी प्रतिनिधी,अनुग्रह कन्या शाळा औरंगाबाद (५) येथून विभागीय व्यवस्थापक, मा. दिलिप आंबेकर, राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद यांना सहलीसाठी मागवलेल्या बसमधील असुविधांबद्दल तक्रार करणारे पत्र लिहितो लिहिते (पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे)

## SECTION- C

**प्रश्न ५ अ) सुचनेप्रमाणे लिहा.** (कोणतेही चार) **(४)**

१. अनिलने स्वत:च्या घरात एक वसतिगृह चालविले होते. ( विशेषनाम ओळखा)

२. दोन्ही चित्रे अत्यंत बोलकी, प्रभावी वाटत होती.( संख्याविशेषण ओळखा )

३. स्वप्नाची एक जबरदस्त मालिका डोळ्यासमोर उभी राहायची.(शब्दयोगी अव्यय ओळखा)

४.झाडांवर मी प्रेम करतो **<u>कारण</u>** झाडे मला आवडतात. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

५. **<u>अरेरे!</u>** घराची पडझड पाहून किती केविलवाणी स्थिती झाली लेखिकेची.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

६. पण त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. ( क्रियापद ओळखा)

**आ) पुढील वाक्ये कंसातील सुचनेप्रमाणे लिहा.**(कोणतेही दोन) **(२)**

१. किती गोंडस बाळ आहे तुमचं! (विधानार्थी वाक्य करा)

२. या सामुदायिक नमाजला खूप गर्दी असे. ( उद्‌गारार्थी वाक्य करा)

३. बाबा कादंबरी वाचतील. (प्रयोग ओळखा)

४. पांडवांनी कौरवांना मारले. (कर्तरी प्रयोग करा)

**इ) सुचनेनुसार बदल करा.**(कोणतेही दोन) **(२)**

१. सुमनच्या डोळ्यांत पाणी आले होते. ( भविष्यकाळ करा))

२. युद्धभूमीवर जवान पराक्रम गाजवतील.( भूतकाळ करा)

३. पृथ्वी सूर्याभोवती फिरते. ( काळ ओळखा)

४. प्रत्येकजण स्वावलंबी आहे. ( भविष्यकाळ करा)

**ई) लिंग बदला.**(कोणतेही दोन) **(२)**

१. गायक

२. महाराज

३. सासू

४. मैना

**उ) वचन बदला.**(कोणतेही दोन) **(२)**

१. आगगाडी
२. पिशवी
३.. मडके
४. पाखरू

**ऊ) समानार्थी शब्द लिहा.**(कोणतेही दोन) **(२)**

१.दवाखाना
२.आकाश
३. नेत्र
४. व्रात्य

**ए) विरूद्धार्थी शब्द लिहा** (कोणतेही दोन) **(२)**

१. जीवन
२. सुसंवाद
३. वैरी
४. शाश्वत

## SECTION- D

**प्रश्न ६ अ) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही चार)** **(४)**

१. आम्ही देशभक्तांची मुले असेच...... सारखे वाढलो व शिकलो.
(झाडा, कॅकटस, झाडा )
२. सुर्वे यांना....पुरस्कार मिळाल्यावर त्यांच्या बरोबर कृष्णाबाई नाशिकला गेल्या.
(आदर्श शिक्षक,जनस्थान,नाशिकभूषण )
३. हा आवाज .......!
( शांततेचा, वाहनांचा, पक्ष्यांचा )
४. बाबाचं घराण......
(श्रीमंताचं, धनवानाचं, मालगुजाराचं )
५. निसर्ग तर माणसाला...... करतो.
(चिंतनशील, विचारशील, कृतिशील )
६. बाबूजी आमच्या गावातलं...... व्यक्तिमत्त्व.
(सोज्वळ, सालस, लोभस )

**आ) खालील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा.( कोणतेही सहा) (६)**

१. "काय राव पुस्तकराव" या पाठात असलेल्या दोन मुलांची नावे लिहा.
२. इंग्रज लोक कसे असतात असे शांता शेळके यांनी ऐकले होते?
३. रविवर्मा यांना त्यांच्या घरातील वडीलमंडळी कोणत्या नावाने हाक मारीत?
४. लेखिकेच्या मते उत्सव कोणत्या मुद्द्यांवर उपद्रवकारक ठरता कामा नयेत?
५. दरगाहची देखभाल करण्यासाठी आदिलशहाने कोणाची नेमणूक केली?
६. आनंदवन कोठे आहे?
७. बाबूजींच्या दोन अपत्यांची नावे लिहा.
८. बी.जी. वाघ यांच्या मते येणारी पिढी कशी असली पाहिजे?

**प्रश्न ७ अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन) (६)**

**१.** शांता शेळके व इंग्रज माणसाचे आवडते लेखक

| | |
|---|---|
| १. | २. |

**२.** लेखक व त्याच्या मित्रांच्या क्लबचे नाव व त्याचा अर्थ

| | |
|---|---|
| १. | २. |

**३.** जेंव्हा माणसे पूर्णपणे मुक्त होतात तेंव्हा ती कशी होतात?

| | |
|---|---|
| १. | २. |

**४.** केशवने स्पार्टेक कुठे बसवली?

| | |
|---|---|
| १. | २. |

**५.** काय पुस्तकराव या पाठाच्या आधारे मोठी माणसे कादंबऱ्या कुठे टाकतात?

| | |
|---|---|
| १. | २. |

**आ) ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा.(कोणतीही दोन )** **(६)**

१. अपूर्व भेट या पाठाच्या आधारे स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वाचे थोडक्यात वर्णन करा.

२.आनंदोत्सव साजरे करताना कोणत्या मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे? तुमच्या शब्दांत लिहा.

३. केशवचा बंगला पाहून लेखकाच्या मनात आलेले विचार,भावना तुमच्या शब्दांत लिहा.

४. वारूळ या पाठाच्या आधारे नागिणीचे शहाणपण या विषयी तुमचे विचार लिहा.

**प्रश्न ८ अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा . (कोणतेही चार)** **(४)**

१. नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई....
( वाचा, वाणी, बोल )

२. ह्दयामधूनी आमुच्या वाहे प्राणवायूचा....समान
( ज्योत, झरा, झोत )

३. असा प्रलय व्हावा..... तुफान सुटावं
( विविधतेचे, समतेचे, एकतेचे )

४. तुझे नामामृत सार । .... जपे निरंतर
( नरहरी, चोखामेळा, नामदेव )

५.गिळून.... सारं, साऱ्या जगा पोसावं
( सुख, दु:ख,अपमान)

६. नाही माझ्या घरट्यात......फुलांचा संभार
( भाव, कल्प, स्वप्न)

**आ) पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही तीन)** **(३)**

१. आपण धरणी गं या कवितेतील स्त्री कोणाकोणाशी आपले नाते आहे सांगते?

२. आजि सोनियाचा दिवस या अभंगात कोणत्या सणांची नावे आली आहेत?

३. जिथे राबती हात या कवितेत कवीने देवासाठी कोणती वेगवेगळी नावे वापरली आहेत?

४. " माझ्या घरट्यात" या कवितेतून कोणता संदेश व्यक्त होतो?

५. 'प्रलय' या कवितेत कवीच्या मते माणसाला काय म्हणून किंमत यावी?

**प्रश्न ९ अ)खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. (३)**

१. असे विश्वकर्मा श्रमांचा पुजारी
२. करूं रक्ताचं पाणी गं
३. गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने

**आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही दोन) (४)**

**१.** प्रलयानंतर घरे अशी निर्माण व्हावीत

| | |
|---|---|
| १. | २. |

**२.** गाव कवितेतील नदीची वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| १. | २. |

**३.** एकत्वाचे गीत महान मध्ये असे मंदिर घडवायचे

| | |
|---|---|
| १. | २. |

**प्रश्न १०) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (४)**
**(कोणतेही दोन)**

१. रत्नागिरीची संस्कृती तुमच्या शब्दांत लिहा.

२. आजीने आपल्या नातवंडास प्रार्थनेचे महत्त्व कसे सांगितले आहे?

३. जुई व चिनार कोणाकडे गेले व का?